मुख्य कार्यालय, विरार
विरार (पुर्व),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401305

दूरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ग्रंथा/२६/२२-२३

दिनांक :- २९/०३/२०२३

## जाहीर दरपत्रक सूचना

वसई विरार शहरमहानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथील सार्वजनिक वाचनालय विरार करिता सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरिता लागणारी दैनंदिन वर्तमानपत्र, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, वार्षिके व दिवाळी अंक इ.वाचनसाहित्य खरेदी करावयाचे आहे. त्याकरिता सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत जाहिर दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रकामध्ये दरपत्रकधारकाने मराठी, इंग्रजी, गुजराती, हिंदी व उर्दु अश्या विविध भाषेतील वर्तमानपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, वार्षिके व दिवाळी अंक इ.वाचनसाहित्याचा पुरवठा सार्वजनिक वाचनालय, विरार येथे करावयाचा आहे. दरपत्रकधारकाने वरील कामाचा दरपत्रकाचा सिलबंद लिफाफा शुक्रवार, दि. २८/०३/२०२३ दुपारी ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय, विरार (पूर्व) येथे दुस-या मजल्यावरील कार्यालयात दिलेल्या मुदतीत जमा करावयाचा आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | तपशिल | सर्व प्रकारच्या वाचनसाहित्याचे एकत्रित दर (सूट) टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | सार्वजनिक वाचनालयसाठी सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरिता लागणारी वर्तमानपत्र, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, वार्षिक व दिवाळी अंक इ.वाचनसाहित्य पुरवठा करणे. | वर्तमानपत्र<br>साप्ताहिके<br>पाक्षिके<br>मासिके<br>नियतकालिके<br>वार्षिक,<br>दिवाळी अंक | सूट (अंकात) -<br><br>सूट (अक्षरात) - |

अटी शर्ती :-

१) दरपत्रकधारकाने व्यक्तीचे/संस्थचे पॅनकार्ड, आधारकार्ड इ.ची छायांकित प्रत साक्षांकित करून व रू.४००० /- इसारा रक्कमेचा डी.डी. इ.कागदपत्रे दराच्या लिफाफ्यासोवत सादर करावयाची आहेत.

२) मुदतीत प्राप्त झालेली कोणतीही अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

३) दरपत्रकधारक मंजूर झाल्यानंतर करारनामा करण्यापूर्वी रू.१२००० /- सुरक्षा अनामत रक्कम भरणा करावी लागेल.

४) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर दरपत्रकधारकाने ०५ दिवसांच्या आत कार्यालयात उपस्थित राहून सदर कामाचा करारनामा करावयाचा असून तदनंतरच कायदिश देण्यात येईल. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

५) दरपत्रकधारकाने नमूद वाचनसाहित्याचा पुरवठा सार्वजनिक वाचनालयाने नेमून दिलेल्या ठिकाणी मुदतीत व वेळेत करावयाचा आहे.

६) मनुष्यबळ, वाहन व यंत्रसामुग्री महानगरपालिका पुरविणार नाही.

७) शासनाचे सर्व विविध कर शासनास व महानगरपालिकेच्या फंडात जमा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची आहे.

८) वरील अटीचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.

उप -आयुक्त (वाचनालय)
वसई विरार शहर महानगरपालिका